मराठवाडा मित्र मंडळाचे कॉलेज ऑफ कॉमर्स, डेक्कन जिमखाना, पुणे - ४११००४

संदर्भ क्र.: एमएमसीसी/शिष्यवृत्ती व फ्रीशिप /२०२०-२१/ 70

१८/०९/२०२०

# सूचना

**मागासवर्गीय तसेच खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशिप व फ्रीशिप सन २०२०-२१ करीता ऑनलाईन पद्धतीने लवकरच चालू होणे बाबत....**

कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील मागासवर्गीय तसेच खुल्या प्रवर्गातील विद्यर्थ्यांना सूचित करण्यात येते कि, जे विद्यार्थी अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/व्हीजेएनटी/विमाप्र/इमाव/खुल्या संवर्गातील आहेत त्यांना शासकीय शिष्यवृत्ती, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना तसेच इतर शासकीय योजना अथवा फ्रीशिप याचा लाभ घेता येतो. अश्या विद्यार्थ्यांनी त्यासाठी खाली नमूद केलेली कागदपत्रे ताबडतोब तयार करावीत की, जेणेकरून शासनाची ऑनलाईन फॉर्म भरण्याची तारीख जाहीर झाल्यावर फॉर्म भरण्यास विलंब होणार नाही व वेळेत अर्ज भरणे सोपे होईल. शासनाची ऑनलाईन शिष्यवृत्ती ज्यावेळेस चालू होईल त्यावेळेस विद्यार्थ्यांना त्याबाबत सविस्तर नोटीस जाहीर केली जाईल.

शिष्यवृत्ती (Scholarship) साठी पालकांची उत्पन्न मर्यादा व्हीजेएनटी/विमाप्र/इमाव करीत रु. १,००,०००/- असून अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी रु. २,५०,०००/- इतकी आहे. तसेच फ्रीशिप (Freeship) अनुसूचित जाती /अनुसूचित जमाती साठी पालकांसाठी उत्पन्न मर्यादा नसून व्हीजेएनटी/विमाप्र/इमाव साठी ची उत्पन्न मर्यादा रु. ८,००,०००/- इतकी आहे. खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी पालकांची उत्पन्न मर्यादा रुपये ८,००,०००/- इतकी आहे. **(शासनाच्या निर्णयानुसार शिष्यवृत्ती/फ्रीशिप/ राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना तसेच इतर शासकीय योजना या सर्वस्वी ज्या अभ्यासक्रमांना शासनाने योजनेचा लाभ घेता येईल अशी मान्यता दिली आहे अश्याच अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांना अर्ज भरता येईल याची कृपया सर्वानी नोंद घ्यावी. शिष्यवृत्ती पात्रते बाबतचा तक्ता http://www.mmcc.edu.in/ या website वर उपलब्ध आहे.)**

वरील योजनेस सर्व पात्र विद्यार्थ्यांनी खाली नमूद केलेले मूळ कागदपत्र size २५० KB पेक्षा कमी असलेले pdf किंवा jpeg स्वरूपात pendrive मध्ये तयार ठेवावे.

१. १० वी, १२ वी उत्तीर्ण झालेली गुणपत्रिका (Original)
२. मागील शैक्षणिक वर्ष २०१९-२०ची उत्तीर्ण झालेली गुणपत्रिका (Original)
३. १० वी / १२ वी चा शाळा सोडल्याचा दाखला (झेरॉक्स)
४. डोमेसाइल सर्टिफिकेट (Original)
५. कास्ट सर्टिफिकेट (Original) (लागू असल्यास)
६. पालकांचा आर्थिक वर्ष २०१९-२० करीता उत्पन्नाचा तहसीलदार दाखला
७. आधार कार्ड (Original)
८. राशन कार्ड (Original)
९. बँक पासबुकचे पहिले पान (Original)
१०. फी भरल्याची पावती (Original)

सर्व पात्र विद्यार्थ्यांनी स्वतःचा मोबाइल नंबर व स्वतःचे बचत खाते हे त्वरित आधारकार्डशी संलग्नित करून घेणे आवश्यक आहे. तसे नसल्यास त्यांची शिष्यवृत्ती अथवा फ्रीशिप जमा ना झाल्यास ते स्वतः जबाबदार राहतील. वरील सर्व नमूद बाबी या आता पर्यंतच्या शासन आदेश नुसार आहेत, तरी नवीन कुठलेही आदेश प्राप्त झाल्यास त्यानुसार बदल केले जातील याची सर्वानी नोंद घ्यावी.

M.M. COLLEGE OF COMMERCE PUNE-4

**डॉ. देविदास गोल्हार**
**प्राचार्य**

Scanned with CamScanner